भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ८२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१२/२०१७

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन लाठया काठयांनी मारहान व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १९/१२/२०१७ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे पतीने ट्रॅक्टर थांबवीला असता यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन प्राण घातक हत्यारासह सज्ज होवुन फिर्यादीचे भासरे – व नौकर यांना लाठया काठयांनी मारहान करुन शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १४३,१४४,३२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाधव पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :-**

दिनांक २०/१२/२०१७ चे ११.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी दिलीप रघुतम चोपकर वय २५ वर्ष, रा. शिवनाळा हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही २१२३ ने पवनी कडे येत असतांना यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन विरुध्द दिशेने येवुन रॉग साईडने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला वडेगाव बस स्थानक समोर येथे धडक देवुन फिर्यादीला तसेच स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८५/२ आर. आर. आर/ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १७/१२/२०१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी श्रीमती लक्ष्मी वासुदेव ब्राम्हणकर वय ६० वर्ष, रा. तावसी व आरोपी यांचे शेताला शेत लागुन असुन फिर्यादी माहेरी गेली असता आरोपीतांनी फिर्यादीचे शेतात अतीक्रमण करुन मिर्चीची झाडे लावले होते ती झाडे फिर्यादीने उपडुन फेकले असता आरोपीतांनी आमची मीर्ची लावलेली झाडे का फेकली असे म्हणुन भांडण, शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन उजवे हाताला व पायाला दुखापत केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. एक्सरे रिपोर्ट पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२५,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/१२/२०१७ चे १६.१५ ते १५.५४ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोर वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. साबळे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गजभिये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक २०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर व भंडारा येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०६ लिटर हातभट्टी दारू + मोटार सायकल किंमती ६००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ५९०/–रु. असा एकुण १,१९०/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २०/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी – ०१ तीन सिटर वाहनांवरती– १३ केसेस व ईतर वाहनांवरती –५६ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.